पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३५ • नोव्हेंबर २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

**सरत्या वर्षाला निरोप देत नवी स्वप्न, नव्या आशा, नवी उमेद व नाविन्याची कास धरत नवीन वर्षाचं स्वागत करु. आपली सर्व स्वप्न, आशा, आकांक्षा पूर्ण होवोत या प्रार्थनेसह नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.**

## छत्रपती संभाजी राजे उद्यान येथे किल्ले स्पर्धा व प्रदर्शन

पुणे महानगरपालिका उद्यान विभाग व वृक्ष प्राधिकरणाचे वतीने सन १९९२ पासून दिपावलीच्या निमित्ताने किल्ले स्पर्धा व प्रदर्शन आयोजित केले जाते. वाढत्या शहरीकरणामुळे, राहणीमानात झालेल्या बदलामुळे



मुलांना महाराष्ट्रात असलेल्या अनमोल किल्ल्यांचा अभ्यास करता यावा, त्याबद्दल मुलांच्या मनात आवड निर्माण व्हावी, इतिहास-भुगोलाची आवड वृध्दिंगत व्हावी, शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने पुणे महानगरपालिका प्रत्येक वर्षी ही स्पर्धा छत्रपती संभाजीराजे उद्यान येथे आयोजित करण्यात येते.

किल्ले स्पर्धेचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता या वर्षी दिपावलीच्या निमित्ताने दिनांक २ ते १० नोव्हेंबर, १३ पर्यंत छत्रपती संभाजीराजे उद्यान, जंगली महाराज रोड, इंद्रप्रस्थ उद्यान, येरवडा, पु.ल.देशपांडे उद्यान, सिंहगड रोड, तात्यासाहेब थोरात उद्यान, कोथरुड व राम मनोहर लोहिया उद्यान, हडपसर मनपा शाळा क्र. १६२ धनकवडी, या ठिकाणी २१ वी किल्ले स्पर्धा व प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक २/११/२०१३ रोजी मा. सौ. चंचला कोद्रे, महापौर, पुणे यांचे हस्ते झाले. सदर स्पर्धेच्या किल्यांचे परीक्षण इतिहास व भुगोल तज्ञ मा. डॉ. सुरेश गरसाळे, श्री. जगजीवन काळे, श्री. आनंद पाळंदे, श्री. सुमित चव्हाण, श्री. कैलास चौधरी, श्री. उदय मुळे, श्री. प्रसाद पवार यांनी केले. पारितोषिक समारंभ दिनांक २/११/२०१३ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मा. श्री. अजित निंबाळकर, आय.ए.एस. (नि), माजी मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन यांचे हस्ते संपन्न झाला. सदरच्या कार्यक्रमास मा. बंडु उर्फ सुनिल गायकवाड, उपमहापौर, मा. श्री. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट), मा.श्री. माधव जगताप, महापालिका सहाय्यक आयुक्त, वृक्ष प्राधिकरणाचे मा. मुकारी अलगुडे व इतर सदस्य हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अशोक घोरपडे, मुख्य उद्यान अधिक्षक यांनी केले. मा. चंचला कोद्रे यांनी सर्व स्पर्धकांचे अभिनंदन केले.

उद्घाटनानंतर सदरचे प्रदर्शन दिनांक १० नोव्हेंबर पर्यंत नागरिकांना विनामुल्य पाहण्यासाठी खुले ठेवण्यात आले होते.

या प्रदर्शनामध्ये शालेय विद्यार्थी, वेगवेगळ्या संस्था तसेच हौशी नागरिकांनी सहभाग घेतला. या वर्षी या प्रदर्शनास फार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळालेला असून, या स्पर्धेसाठी सुमारे १२० किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. या प्रदर्शनामध्ये प्रामुख्याने सिंहगड, राजगड, शिवनेरी, जंजिरा, साल्हेर, सिंधुदुर्ग, सूर्यगड, लोहगड, तुंग, मुरुड, खांदेरी, विजयदुर्ग, तोरणा, प्रतापगड, दुर्गलिंगाणा, देवगिरी, मोहरानगड, ढाकबहिरी, काल्पनिक किल्ला, रोहिडा, आग्रा, व्हाईट कॅस्टल, डॉलोगोरॉ डॉक, इत्यादी किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. ऐतिहासिक किल्ल्यांची दुरवस्था याबाबतच्या प्रबोधनपर किल्ल्यांच्या प्रतिकृती लहान मुलांनी साकारल्या होत्या.

या प्रदर्शनामध्ये एकाच ठिकाणी महाराष्ट्रातील व देशाबाहेरील विविध किल्ले नागरिकांना पाहता आले. किल्ल्यांचे नकाशे, किल्ल्यांवर व पर्यावरणावर आधारित घोषवाक्य, इत्यादीमुळे किल्ल्यांबाबतची अधिक माहिती मिळत होती.

## कामगार नेते कॉ. आप्पासाहेब भोसले यांच्या ११ व्या स्मृतीदिनानिमित्त रक्तदान शिब िराचे आयोजन

पीएमसी एम्प्लॉईज युनियनच्या वतीने दिवंगत कामगार नेते कॉ. आप्पासाहेब भोसले यांच्या ११ व्या स्मृती दिनानिमित्त दिनांक १९ नोव्हेंबर, २०१३ रोजी पुणे महानगरपालिका भवन येथे ससून सर्वोपचार रुग्णालयाचे सहकार्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबीराचे उद्घाटन मा.श्री.राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) व मा.श्री. अभिषेक कृष्णा, अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे हस्ते करण्यात आले.

रक्तदान शिबीराचे उद्घाटन प्रसंगी मा.श्री. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, मा.श्रीमती मंजुषा इधाटे, म्युनिसिपल प्रॉसिक्युटर, मा.श्री.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी व इतर मनपा अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर रक्तदान शिबीरात ७२ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना युनियनचे वतीने भेटवस्तू देण्यात आल्या.

तसेच रक्तदान शिबीरास ससून सर्वोपचार रुग्णालयाचे मोलाचे सहकार्य लाभले.



## पुणे महानगरपालिकेत संविधान दिवस साजरा

भारताचे संविधान हे भारत देशाचा पायाभूत कायदा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. संविधान लेखन समितीचे मा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अध्यक्ष तर मा.के.एम.मुनशी, मा.अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, मा.एन. गोपालस्वामी आय्यंगार, मा.बी.एल.मित्तल, मा.एम.डी. सदाहुल्ला व मा.डी.पी.खेतान सदस्य होते. दिनांक २६/११/१९४९ रोजी राज्यघटनेचा स्विकार केला गेला व दिनांक २६/१/१९५० पासून राज्यघटना अंमलात आली.

दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो. पुणे महानगरपालिकेमध्ये दिनांक २६ नोव्हेबर, २०१३ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी भारतीय संविधानाचे स्मारकास फुलांनी सजवून, रांगोळी काढण्यात आली होती. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन मनपा भवनाच्या हिरवळीवर सकाळी १०.३० वाजता करण्यात आले. यावेळी मा.श्रीमती माधुरी सहस्त्रबुध्दे, सभासद, मा. मुकारी अलगुडे, सभासद, मा.शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार),



मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (ज), मा. मंजुषा इधाटे, म्युनिसिपल प्रॉसिक्युटर, मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी, मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी व इतर मनपा अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. यामध्ये खालीलप्रमाणे संविधानाचे वाचन करण्यात आले :

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ति, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन, आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगिकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

## संपादकीय...

# वारस नियुक्ती (घाणभत्ता)

पुणे महानगरपालिकेतील घाणभत्ता अनुज्ञेय असणाऱ्या सफाई कर्मचारी/बिगारी संवर्गातील सेवक सेवानिवृत्त, ऐच्छिक सेवानिवृत्त, वैद्यकीयदृष्ट्या शारिरीक अपात्र, मयत, इत्यादी कारणास्तव महापालिका सेवेतून सेवानिवृत्त झाल्यास त्याच्या एका पात्र वारसास मा. लाड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देण्यात येते. अशी वारस नियुक्त देताना सेवानिवृत्ती दिनांकानंतर एक महिन्याच्या मुदतीमध्ये देणे अनिवार्य आहे. तथापि, काही वारस प्रकरणे वेळेत पूर्ण केली जात नाहीत किंवा कार्यालयाकडून प्रस्ताव पाठविण्यास विलंब होत असल्याचे दिसते.

वारस प्रकरणी संबंधित खात्याकडील शिरस्तेदार, सिनिअर ग्रेड लेखनिक, पगारपत्रक लेखनिक यांनी प्रकरणे वेळेत निकाली काढणेबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. यासाठी पुढील बाबी विचारात घेतल्यास वारस प्रकरणे वेळेत निकाली काढणे शक्य होईल.

१. सफाई कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी वारस नियुक्तीबाबत पूर्तता करावयाच्या कागदपत्रांची यादी संबंधित पगारपत्रक लेखनिक यांनी सेवानिवृत्त सेवकास देणे आवश्यक आहे. जेणेकरुन संबंधित सेवक त्याच्या सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत आवश्यक कागदपत्रे व त्याच्या वारसाच्या नोकरीचा अर्ज तो वेळेत कार्यालयात समाविष्ट करु शकेल. तसेच, त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्या वेळीच निरस्त करणे शक्य होईल.

२. सफाई कर्मचाऱ्यांना वारस नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती यांची स्पष्ट व आगाउ माहिती लेखी स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी. जेणेकरुन अर्ज उशिरा करणे, चुकीचा वारस देणे, चुकीची कागदपत्रे देणे, इत्यादी बाबी टाळता येवू शकतील.

३. दिनांक ११/८/२००६ पूर्वीच्या शासन परिपत्रकानुसार सेवानिवृत्त सेवक हयात असल्यास त्याच्या इतर पात्र वारसांची लेखी संमती घेण्याची आवश्यकता नाही. तथापि, असे असतानाही बऱ्याच प्रकरणी इतर वारसांची लेखी संमती प्रतिज्ञापत्र करुन घेण्यात येते. प्रकरणी संबंधित सेवकास नाहक ख र्च करावा लागतो व कालापव्यय होतो.

४. वारस नियुक्ती प्रकरणी सेवानिवृत्त सेवक हयात असल्यास सेवकाच्या वारसासंबंधी खात्री करण्याकरिता खात्यांतर्गत करावयाच्या चौकशीचा फॉर्म भरण्याची आवश्यकता नसते. तसेच, याबाबत संबंधित सेवानिवृत्त सेवकास बोलावून घेवून संबंधित खात्याधिकाऱ्यांनी त्यांच्या वारसांची खातरजमा करावयाची असते.

५. सेवेत असताना निधन पावलेल्या सेवकाच्या वारसासंबंधी खात्री करण्याकरिता खात्यांतर्गत करावयाच्या चौकशीचा फॉर्म संबंधित खात्याने एक आठवड्यात भरुन तो प्रकरणी समाविष्ट करणे आवश्यक आहे. जेणेकरुन विहित मुदतीमध्ये कार्यवाही पूर्ण करणे शक्य होते.

६. सेवक हयात असल्यास त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीस नोकरी देणे आवश्यक आहे. तथापि, सेवक हयात नसल्यास शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार इतर पात्र वारसांची संमती घेवून एका पात्र वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येते. निधन पावलेल्या सेवकाच्या बाबतीत पात्र वारसांमध्ये पती/पत्नी, मुलगा/सुन, अविवाहित मुलगी, विधवा/घटस्फोटीत मुलगी, विधवा/घटस्फोटीत बहिण इत्यादींचा समावेश होतो. तसेच, सेवक अविवाहित असल्यास पात्र वारस म्हणून त्याच्या भावाचा देखील समावेश होतो.

७. सेवकाच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या व दुसऱ्या पानाची छायांकित प्रत, घाणभत्ता मिळत असल्याची प्रत, ओळखपत्र, अंतिम वेतनचिठ्ठी, इत्यादी कागदपत्रे घाणभत्ता प्रकरणास जोडण्याची जबाबदारी संबंधित पगारपत्रक लेखनिक यांची आहे. तसेच, संबंधित सेवक/वारसांकडून देण्यात येणाऱ्या कागदपत्रांबाबत खातरजमा करुन संबंधित खात्याचे शिरस्तेदार यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

८. वारस नियुक्ती प्रकरणी अर्ज करण्याची मुदत एक वर्ष असल्याने याबाबत संबंधित सेवक/वारसास लेखी कळविण्याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन एक वर्षानंतर अर्ज करणेबाबतची प्रकरणे दाखल होणार नाहीत. तसेच, वारस अज्ञान असल्यास अर्ज करण्याची मुदत ही वारस सज्ञान (१८ वर्षे पूर्ण) झाल्यानंतर एक वर्षापर्यंत असते.

९. सफाई कामगारास नंतर चतुर्थश्रेणीतच पदोन्नती मिळाली असल्यास त्यास वारस नियुक्तीचे फायदे देय होतात. तथापि, अशा सेवकांची तृतीय श्रेणीमध्ये पदोन्नती झाल्यास वारस नियुक्तीचा लाभ अनुज्ञेय होत नाही.

# ओळख गुणवंताची

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्री. काळुराम दत्तु लोखंडे, बिगारी, नगररोड क्षेत्रीय कार्यालय यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्री. काळुराम दत्तु लोखंडे यांचा जन्म ३ सप्टेंबर, १९६८ रोजी मरकळ या गावामध्ये एका गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबात झाला. त्यांना दोन बहिणी व तीन भाउ आहेत. कुटुंबास पोटापुरते पिकेल एवढीच शेती त्यांना होती. भावाने वडिलांच्या खांद्याला खांदा लावून शेतात काम करुन श्री. लोखंडे यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. हलाखीच्या परिस्थितीत कसेबसे त्यांनी दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. लहानपणापासूनच श्री. लोखंडे यांना व्यायामाचा छंद होता. गावातील तालमीत व्यायाम करुन तेथील खेळाडूंसोबत कुस्ती खेळण्याची त्यांना आवड निर्माण झाली. खेळामध्ये पहिल्यापासूनच चपळपणे खेळणारा खेळाडू म्हणून तालमीतील खेळाडू त्यांच्याकडे पाहत. परंतु घरच्या आर्थिक अडचणीमुळे कोल्हापूरला जावून पहिलवान होण्याचे स्वप्न श्री. लोखंडे यांना पूर्ण करता आले नाही. आजूबाजूच्या गावच्या यात्रेत जावून आखाड्यात कुस्त्या खेळून त्यांनी अनेक छोटी-मोठी बक्षिसे मिळविली.

दहावीनंतर त्यांनी एक वर्षाचा आयटीआयमधून फिटरचा कोर्स केला व बजाज ऑटोमध्ये सहा महिने काम केले. त्यानंतर एका खाजगी कंपनीमध्ये नोकरी करत असतानाच त्यांना १९९७ साली पुणे महानगरपालिके मध्ये मुलाखतीसाठी कॉल आला. येथे कोणाचीही ओळख नसताना केवळ नशीबाच्या जोरावर अतिक्रमण विभागात बिगारी म्हणून त्यांची निवड झाली. ही आनंदाची बातमी ऐकून त्यांच्या वडिलांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले. कारण त्यांच्या कुटुंबात कोणालाही सरकारी नोकरी नव्हती.

अतिक्रमण विभागात श्री. लोखंडे यांनी अतिशय चिकाटी व सचोटीने काम केले. अतिक्रमण कारवायांमध्ये कायम पुढे राहून काम



**श्री. काळुराम लोखंडे**
**नगररोड क्षेत्रीय कार्यालय**

केले. मोठमोठ्या अतिक्रमण कारवाया करताना अनेक अडचणी येतात. तथापि, या सर्व संकटांना तोंड देत थेट कारवाया करण्यामध्ये ते सहभागी होत.

कुस्तीची लहानपणापासूनच आवड असल्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच प्रा.दिनेश गुंड (आळंदी) यांच्यासारखा कुस्तीगीर मित्र म्हणून लाभला. त्यांच्या संगतीत राहून वेगवेगळ्या ठिकाणी कुस्ती स्पर्धांमध्ये भाग घेवून चांगल्या प्रकारे त्यांनी प्राविण्य मिळविले. त्यातच दादोजी कोंडदेव पुरस्कार सन्मानित श्री. विलास कथुरे यांच्या सांगण्यावरुन त्यांनी २००३ साली यवतमाळ येथे महाराष्ट्र राज्य कुस्ती अधिवेशनात घेण्यात आलेल्या पंचांची परीक्षेत ते चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाले. त्यानंतर आळंदी येथील जोग महाराज व्यायाम शाळेमध्ये पंचाची कामे कशी करावी हे प्रशिक्षण ते घेत राहिले.

पंचाचे प्रशिक्षण घेतल्यानंतर तालुका, जिल्हा, राज्य व देशपातळीवरील वेगवेगळया स्पर्धांमध्ये श्री. लोखंडे यांनी पंचाचे काम पाहिले. सन २००३ मध्ये यवतमाळ येथे, दिनांक १२ ते १६ डिसेंबर, २००६ मध्ये बारामती, दिनांक १ ते ५ जानेवारी, २००६ मध्ये इंदापूर, दिनांक २६ ते २९ नोव्हेंबर, २००५ मध्ये शिव छत्रपती क्रिडा पेठ, बालेवाडी, पुणे, दिनांक २६ ते ३० मे, २००४ मध्ये ज्युनिअर नॅशनल कुस्ती स्पर्धा, पंजाब, दिनांक २७ ते ३० मार्च, २००३ मध्ये रोहा (लोहगड) येथे पंचाचे काम चांगल्या प्रकारे पार पाडले. दिनांक ३१ मार्च ते ३ एप्रिल, २००६ रोजी सब ज्युनिअर रोमन आणि फ्री स्टाईल नॅशनल (हरियाना) येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत त्यानी पंच म्हणून काम पाहिले. दिनांक ११ ते १५ नोव्हेंबर, २००७ रोजी संभाजीनगर, औरंगाबाद, २६ ते २८ डिसेंबर, २००८ रोजी ३१ वी कुमार राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा, वाघोली, दिनांक २४ ते २७ डिसेंबर, २००९ रोजी झालेल्या हिंद केसरी अजिंक्य कुस्ती स्पर्धा, दिनांक १८ ते २३ डिसेंबर, २००६ रोजी रोहा, रायगड, दिनांक ३० नोव्हेंबर, ते ४ डिसेंबर, २०१३ रोजी भोसरी येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेमध्ये पंच म्हणून काम केले. या यशामुळे श्री. लोखंडे यांना पुणे महानगरपालिकेने सन २०१०-११ चा गुणवंत कामगार पुरस्कार मा,वैशाली बनकर, महापौर, पुणे यांच्या हस्ते गौरवचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले.

श्री. लोखंडे यांचा यशाचा आलेख उत्तरोत्तर असाच वाढत राहो. त्यांच्या पुढील वाटचालीस कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

# म. जोतीराव फुले

जीवनात सत्याचा मूलमंत्र काया-वाचा-मने जपणाऱ्या महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल, १८२७ मध्ये पुणे येथे झाला. फुले घराण्याचे मूळगाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होय. त्यांचे मूळ उपनाव गोऱ्हे असे होते. ते जातीने क्षेत्रिय माळी होते. बालवयातच आईच्या मायेचे छत्र हरपलेल्या जोतीरावांना गोविंदराव फुले यांनी मोठ्या प्रेमाने वाढविले. शाळेत घातले. जोतीरावांना इंग्रजी शिक्षणाचे वेध लागले होते. मागील अनंत अडचणी आल्या तरीही त्यांनी शालांत शिक्षण पूर्ण केले.

वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचा विवाह धनकवडीच्या झगडे पाटील यांच्या सावित्रीबाई या कन्येशी झाला. जोतीरावांच्या मनात सामाजिक विषमतेबद्दल चिड होती. त्याविरुध्द संघर्ष केला पाहिजे असा त्यांनी निर्धार केला. अज्ञानरुपी अंध:काराला दूर करण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे अस्त्र नाही. शिक्षणाने मनुष्याला सत्य व असत्याचा व अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती प्राप्त होते. हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी शिक्षण चळवळ गतिशील करण्याचा प्रयत्न केला. पुण्यात १८४८ मध्ये भारतातील मुलींची पहिली शाळा सुरु केली. ही शाळा बुधवार पेठेतील भिडेवाड्यात भरत असे. त्या काळात शिक्षक मिळणे कठिण असल्यामुळे जोतीरावांनी आपली पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देवून शिक्षीका नेमले. यानंतर चिपळुणकरवाडा, रास्तापेठ व वेताळपेठेत त्यांनी शाळा सुरु केल्या.

विधवांच्या केशवपनाची अमानुष चाल बंद करण्यासाठी जोतीरावांनी त्या विरोधात चळवळ केली. तसेच बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना करुन अनेक अनाथ मुलांचा सांभाळ या संस्थेमार्फत केला. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याकरिता जोतीबांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सर्वसाक्ष जगत्पती त्याला नको मध्यस्थी असे या समाजाचे ब्रिद होते. जोतीबांनी १८७३ मध्ये गुलामगिरी व १८८५ मध्ये शेतकऱ्यांचा आसूड हे ग्रंथ लिहिले. सार्वजनिक सत्यधर्म हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर १८९१ मध्ये प्रकाशित झाला.

सन १८७६-८२ या कालावधीत जोतीराव फुले पुणे नगरपालिकेचे सदस्य होते.

# अधुरी कथा

लिहता लिहता सागरने पेन ठेवले व कागद फाडून त्याचा गोळा करुन टोपलीत टाकला. टोपलीत कागदांचा ढीग झाला होता.

"एक वाक्य मनाजोगे झालं तर शपथ" तो पुटपुटला. त्याने पेन घेतले. पेनचा चाळा करीत तो विचार करु लागला. इतक्यात दार वाजले. सागरने दार उघडले. दारात त्याचा मित्र महेंद्र उभा होता.

"काय लेखक महाशय! झाली का कथा तयार?" महेंद्रने आत येत विचारले.

"गप ना साल्या! एकतर मनासारखे लिहणे जमत नाही आणि त्यात तू" सागर वैतागून म्हणाला.

सरजामे व महेंद्र सानप हे दोघे सहावीपासूनच त्यांची मैत्री होती. १० वी नंतर सागर डिप्लोमाकडे तर महेंद्र कमर्शिअल आर्टकडे वळला. पण त्यांची मैत्री कायम राहिली. पुढे सागर एका प्रसिध्द बिल्डरकडे तर महेंद्र एका नियतकालिकाच्या कार्यालयात कमर्शिअल आर्टिस्ट म्हणून कामाला लागला. दोघांचे क्षेत्र वेगळे असले तरी, दोघे नियमितपणे भेटत होते.

महेंद्र मूळचा बारामतीचा. शालेय व कॉलेजचे शिक्षण त्याने हॉस्टेलमध्ये राहून पूर्ण केले होते. त्याचे नुकतेच लग्न झाले होते. शहरात दोन खोल्या भाड्याने घेवून तो पत्नी वासंतीसह राहत होता. सागर अविवाहित होता. त्याचे मूळ गाव शहरापासून जवळच होते. मात्र शहरात तो एक खोली घेवून राहत होता.

सागरला लेखनाची आवड होती. शालेय जीवनात त्याने प्रबंध व निबंध लेखनात अनेक बक्षिसे मिळवली होती. महेंद्रच्या नियतकालिकाने दिवाळी निमित्त एक कथा स्पर्धा आयोजित केली होती. सागरची लेखनाची हौस व त्याची कुवत माहित नसल्यामुळे महेंद्रने त्याला या स्पर्धेमध्ये भाग घेण्यास प्रवृत्त केले होते. सागर त्याचीच तयारी करत होता. मात्र साईटवरील दिवसभराच्या कामामुळे त्याला पुरेसा वेळ मिळत नव्हता.

"अरे! या वेगाने लिहित राहिलास तर दिवाळीपर्यंत तरी कथा पूर्ण होईल का?" महेंद्रने विचारले.

"मी काय करु सांग? कधी सुरुवात चांगली वाटते तर पूर्वार्ध अयोग्य वाटतो. कधी पूर्वार्ध चांगला वाटला तर उत्तरार्ध मनाला पटत नाही. दोन्ही जमले तर शेवट मनासारखा येत नाही. मनामध्ये विचार करताना छान जुळणी होते. पण कागदावर प्रत्यक्ष उतरविताना शब्दच हरवून जातात. दहा पानाची कथा जन्माला घालण्याइतका मर्दपणा माझ्यात नाही असे वाटायला लागले आहे." सागर हताश होवून म्हणाला.

"अरेच्या! शाळेमध्ये निबंध, प्रबंध, लेख या स्पर्धांमध्ये दरवर्षी ढाल मिळविणारा सागर सरजामेच बोलतोय का हे ? असं हताश होवून चालायचं नाही! तुझ्याकडे कथाच काय, पण कादंबरी लिहिण्याचीही कुवत आहे, याची मला खात्री आहे आणि एवढ्यात तू पळ काढतोस?" महेंद्र म्हणाला.

"तसं नाही रे! पण आपण कथेचा विषय जरा क्रिमिनल टाईप घेतला आहे. त्यामुळे सारे प्रसंग, पात्र, घटना या वास्तववादी वाटायला हव्यात. तसंच कथेला जरासुध्दा अतिशयोक्तिक स्वरुप येता कामा नये. वाचकांना हे असं कसे? असे वाटता कामा नये. त्यांना कथा ही सत्य घटनाच वाटली पाहिजे आणि यासाठी फार काळजी घ्यावी लागत आहे. कोठे विषयांतर होत नाही ना, एखादे पात्र विनाकारण येत नाही ना? एखाद्या पात्राला अवास्तव महत्व दिले जात नाही ना याची काळजी घ्यावी लागत आहे. त्यामुळे जरा कोठे चूक झाली की पहिल्यापासून सुरुवात करावी लागते." सागर म्हणाला.

थोडावेळ विचार करुन महेंद्र म्हणाला, तू असं करीत जा ना, तू जे काही लिहीशील ते मला वाचून दाखवित जा म्हणजे एक वाचक म्हणून मला काय वाटतं हे मी तुला सांगेल व त्याप्रमाणे तुला सुधारणा करता येतील. कसे?"

सागरला ते पटले. त्याने मग कथेचे सूत्र सांगण्यास सुरुवात केली.

"ही एका व्यभिचारी आणि चंचल अशा स्त्रीची शोकांतिका आहे. व्यभिचारी आणि चंचल अशासाठी की, लग्नापूर्वी हिचे एका तरुणाशी प्रेमसंबंध असतात. पण तो गरीब असतो. एक पैसेवाला नवरा पाहून ती त्या प्रियकराला धोका देवून पैसेवाल्याशी लग्न करते. लग्नानंतर तिच्या पतीला तिच्या पहिल्या प्रेम प्रकरणाविषयी समजते. तो संतापतो. पण तिचा पूर्वाश्रमीचा प्रियकर त्याला भेटतो व त्याचे प्रेम हे भावनिक व मानसिक पातळीवरच होते. ते पवित्र होते, त्यामध्ये वासनेचा लवलेशही नव्हता याची ग्वाही देतो व तिला माफ करण्याची विनंती करतो. पतीही मोठ्या मनाने तिला माफ करतो व सर्व विसरतो. पण लग्नानंतरही तिची चंचल वृत्ती तिला स्वस्थ बसू देत नाही. ती तिसऱ्याच एका पुरुषाच्या प्रेमात पडून त्याच्याशी संबंध ठेवते आणि हे जेव्हा तिच्या पतीला समजते तेव्हा तो संतापतो. कारण पूर्वीचे प्रकरण ही बालवयातील चूक असे मानून त्याने तिला माफ केलेले असते. पण जेव्हा दुसरा प्रकार त्याला समजतो तेव्हा आपली पत्नी काय लायकीची स्त्री आहे हे त्याच्या लक्षात येते व संतापून तो तिचा खून करतो." सागर बोलायचा थांबला. तोपर्यंत महेंद्रने मध्ये बोलून त्याला डिस्टर्ब केले नव्हते. सागरचे झाल्यावर तो म्हणाला,

"उत्तम! फारच चांगली कथा होईल ही मग आता अडचण कसली?

अरे! ही कथेची मध्यवर्ती कल्पना झाली. पण ती व्यवस्थित लिहता यायला हवी की नाही? बाजारातून फुल, सुई, दोरा एवढं आणून ठेवलं की हार तयार होतो का ? नाही ना? तसंच कथेचं आहे. हे सर्व मुद्दे व्यवस्थित मांडून कथा पूर्ण करावयास हवी आणि तिथच तर आमचं घोडं पेंड खातय. तिचा खून करताना त्याने अगदी वेगळा पण शक्य होईल असा प्लॅन केलेला हवा, तसेच कथेची मध्यवर्ती व्यक्तिरेखा म्हणजे हिरो कोण असावा, खून केल्यानंतर स्वत:ला निर्दोष दाखविण्यासाठी तिच्या पतीकडे कोणते मुद्दे असावेत इत्यादीचा विचार करताना डोके आउट होवून जातं बघ!" एवढे सांगून सागर थांबला.

"मला वाटतं हिरो हा तिचा पती असावा, म्हणजे सर्व पात्रांना समान महत्व येते. खून करणारा तोच आहे, त्यामुळे हिरोही तोच आला आणि प्लॅन काय दाखवायचा हे आपण ठरवू. तूर्तास तु पूर्वार्ध पूर्ण कर, दोन दिवसांनी परत बसून आपण उत्तरार्ध फायनल करु." महेंद्र म्हणाला व त्यानंतर तो निघून गेला.

पण त्यानंतर आठ-दहा दिवस दोघांचीही भेट होवू शकली नाही. महेंद्र प्रेसच्या कामासाठी नेहमीप्रमाणे मुंबईला गेला तर सागरच्या साईटवर स्लॅब असल्याने त्यालाही सवड झाली नाही. दरम्यान सागरने ठरल्याप्रमाणे पूर्वार्ध लिहून तयार ठेवला व सवड मिळताच त्याने महेंद्रच्या कार्यालयामध्ये फोन केला. महेंद्र नुकताच मुंबईहून आलेला होता. दोन दिवसांनी भेटण्याचे त्याने कबुल केले.

महेंद्र मग मुंबई भेटीचा रिपोर्ट लिहिण्यास बसला. इतक्यात ऑफिसमधील क्लार्कने त्याच्या नावे आलेले पत्र त्याला दिले. पत्र चार-पाच दिवसांपूर्वी आलेले होते. ऑफिसच्या पत्त्यावर, वरती खाजगी असं लिहिलेलं पत्र पाहून त्याला आश्चर्य वाटले. पत्र फोडून तो वाचू लागला. वाचता वाचता त्याचा चेहरा गंभीर झाला. पत्र वाचून झाल्यावर तो सुन्नपणे बसून राहिला. रिसेप्शनिस्टने त्याचा चेहरा पाहून "एनी प्रॉब्लेम मि. सानप ?" असे विचारले.

"नो नॉट अॅट ऑल!" महेंद्र



**लेखक : श्री.सुनिल कदम**
**अभियंता, पाणीपुरवठा विभाग**

म्हणाला. काही वेळाने त्याने विचारले, "मॅडम माझे काही फोन आले होते का?"

"होय! आय अॅम सॉरी! मी सांगायला विसरलेच! लागोपाठ चार-पाच दिवस एका माणसाचा तुम्हाला फोन येत होता आणि आजही तो करणार आहे. पण त्याने नाव नाही सांगितले. खाजगी काम आहे असं म्हणत होता. तुम्ही यापूर्वी सांगितल्यामुळे मी तुमचा मोबाईल नंतर त्या व्यक्तिला दिला नाही." ती म्हणाली.

पाचच मिनिटांनी तो फोन आला. फोन घेतल्यानंतर पाच मिनिटे महेंद्र फक्त ऐकत होता. पलीकडच्या व्यक्तिचे बोलणे संपल्यावर महेंद्र त्या व्यक्तिला म्हणाला, "हे पहा, आपण स्वत:ला माझे हितचिंतक म्हणवता मग स्वत:चं नाव का सांगत नाही ? त्यामुळे मी आपल्या बोलण्यावर विश्वास का ठेवावा ? आणि तुम्ही सांगितलेले जर खरं आहे, असं तुम्ही म्हणता मग माझ्यासमोर का येत नाही? शिवाय ......." पण पलीकडून फोन कट झाला. महेंद्र मनातून खरं तर चिडला होता, बोलणाऱ्या व्यक्तिचे नाव समजले असते तर त्याने नक्कीच त्याला बडवले असते, पण सध्यातरी तो काहीच करु शकत नव्हता. काही वेळाने, ड्रॉवरमध्ये सर्व कागदपत्रे ठेवून तो उठला, "उद्या रिपोर्ट देतो!" असे सांगून तो बाहेर पडला. त्याच्या मनात विचारांचे काहूर माजले होते. तो फोन त्याची पत्नी वासंतीबद्दल होता. फोनवरील व्यक्ति वासंती व्यभिचारी असल्याचे सांगत होती. यामुळे तो व्यथित झाला होता.

ऑफिसमधून तो तडक घरी आला. त्याने दारावरची बेल वाजवली. वासंतीने दार उघडले. तिचा अवतार पाहण्यासारखा झाला होता. हाताला, डोक्याला, तोंडाला पीठ लागलेले. साडी थोडीशी वर खोचलेली, हातामध्ये लाटणं अशा अवतारात तिने दार उघडले होते. त्याला पाहताच "अय्या! तुम्ही केव्हा आलात मुंबईहून ? आणि येताना फोन तरी केलात का ?" असे म्हणून ती त्याला बिलगली. "अगं अगं! कपडे खराब होतील ना!" तो थोडा दूर सरकत म्हणाला.

"झाले तर झाले खराब! माझे हात अजून शाबूत आहेत, तुमचे कपडे धुवायला!" असे म्हणून ती त्याला आणखीनच बिलगली. त्याचा विरह तिला सहन न झाल्यासारखा वाटत होता. तिने त्याच्या नाकाला आपल्या हाताचे पीठ लावले व ती हसू लागली. त्यानेही हसत आपल्या हाताची मिठी तिच्या शरीराभोवती मारली व तिचे त्या अवताराचे चुंबन घेतले.

काही वेळाने ती त्याच्यापासून दूर होत आत पळाली. महेंद्र एका सोफ्यावर बसला. तिचे वागणे पाहून तो सुखावला होता. त्याच्या मनात उठलेले वादळ शांत झाले होते. बराच वेळ पानझड झाल्याने झाडाखाली पालापाचोळ्याचा मोठा थर जमावा पण वाऱ्याच्या एका जोरदार झोताबरोबर सारा पाचोळा उडून जावा नि जागा स्वच्छ, मोकळी व्हावी असंच त्याच्या मनाचे झाले होते. तो आनंदाने उठला. किचनमध्ये जावून त्याने वासंतीला पाठीमागून मिठी मारली. तिच्या गालावर गाल घासत तो म्हणाला,

"वासू, आज स्वयंपाक बंद! दोघे बाहेर जावून जेवू."

वासंतीने सुरुवातीला आढेवेढे घेतले पण त्याचा मूड पाहून ती ही तयार झाली. दोघांनी मग मजेत संध्याकाळ घालविली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी महेंद्र सागरकडे गेला. दोघांनी मग चर्चा करुन कथेचे स्वरुप पक्के केले. कथेची मांडणी खरोखर उत्कृष्ट झाली होती. महेंद्रच्या मते सागरने केलेला प्लॅन अप्रतिम होता. पण तरीही, महेंद्रला काहीतरी खटकत होते. तो सागरला म्हणाला, "सागर तुझ्या कथेतील, तिच्या पूर्वीच्या प्रियकराने आत्महत्या केलेली का दाखविली आहेस?"

"अरे! आता असं बघ, तिने जरी त्याला धोका दिलेला असला तरी ही त्याने तिच्यावर प्रेम जराही कमी झालेले नसते आणि आपला हिरो म्हणजे तिचा पती खून केल्यानंतर त्याला मुद्दाम भेटतो. कारण या प्रियकराने जर पोलिसांना तिच्या पूर्वीच्या प्रेम प्रकाराबद्दल तिच्या पतीला माहिती होती, असे सांगितले असते तर त्याला पत्नीचा खून करायला सबळ कारण आहे, असे मानून पोलिसांनी त्या दृष्टीने तपास केला असता आणि ते आपल्या हिरोला महागात पडले असते. असं होवू नये म्हणून तो त्या प्रियकराला भेटतो व तिच्यावर आपले किती प्रेम होते, तिच्या मृत्युने आपल्याला किती दु:ख झाले याचे तो रडत रडत वर्णन करतो. त्यामुळे तिच्या प्रियकराने तिच्याबद्दलचे उरले सुरले गैरसमज नष्ट होतात. त्याने लिहिलेली चिठ्ठीच तुला वाचून दाखवतो, म्हणजे त्या मन:स्थितीची तुला कल्पना येईल, ऐक."

- उर्वरित भाग पुढील अंकात-

# नारी तुझे रुप....

तुझे रुप कोणते? फक्त एक स्त्री म्हणून ? का आणखी काही ? फक्त स्त्री म्हणून तर नक्कीच नाही. तुला त्या देवानी रुप दिलंय ते महाशक्तीचं. निसर्गातील एका निर्मिती स्त्रोताचं. निर्मिती स्त्रोताचं तुझं हे रुप विलक्षण असंच नवनिर्मितीची संपूर्ण जबाबदारी त्यानी तुझ्यावर टाकली. तुझ्यावरच का? कारण त्याला ही खात्री होती की त्याने तुला जे गुण अर्पण केले त्या अद्वितीय गुणांचा सांभाळ योग्यरितीने फक्त तुझ्याकडूनच होईल. कधी समजुतीने, कधी माउलीच्या प्रेमाने, कधी शांती रुपाने, तर कधी दुर्गेच्या रुपाने तु त्या जबाबदारीला न्याय देवू शकशील. आणि हा त्याचा विश्वास तु यथार्थपणे पेललास.

जगाच्या सुरुवातीपासून ते आत्तापर्यंत. पण तुला त्याच्याकडून मिळालेल्या या दैवी देणगीचा विचार किती केला जातो. आपल्याला हे काही दिलेलं आहे याची जाणीव तरी होते का? बऱ्याच वेळा काही ऋषीमुनींनी तयार केलेले श्री देवीसूक्त हे स्तोत्र अनेक जण रोज वाचत असतील. त्यात त्या देवीची अनेक रुपांची स्तुती केलेली आहे.

आता हे सूत्र म्हणजे घोकंपट्टीसाठी नक्कीच नाही. मग ती जी रुपं आहेत ती एका स्त्रीची आहेत. त्यातील सर्व गुण स्त्रीमध्ये असावेत अशी अपेक्षा आहे. या गुणांच्या स्विकारण्याने त्या स्त्रीचे रुप परिपूर्ण देवी स्वरुप होईल. तेंव्हाच ते पूजिले जाईल, तिला नमन केले जाईल. त्यातील एक एक स्वरुप स्विकारण्याचा प्रयत्न करावा. त्यात अशक्य असे काहीच नाही.

या देवी सर्वभूतेषु
वृत्तिरुपेण संस्थिता!!
नमस्तस्यै नमस्तस्यै
नमस्तसै नमो नम:!!

# देशाला देण्यासाठी तुमच्याकडे दहा मिनिटे वेळ आहे का ?

जरा त्राग्यानेच विचारतो, की देशाला देण्यासाठी तुमच्याजवळ १० मिनिटे वेळ आहे का? असेल तर ऐका. तुम्ही म्हणता, आपले शासन कुचकामाचे आहे. तुम्ही म्हणता, आपले कायदे फार जुनाट झाले आहेत. तुम्ही म्हणता, नगरपालिका कचऱ्याचे ढीग उचलत नाही. तुम्ही म्हणता, फोन्स चालत नाहीत. रेल्वेसेवा विनोदी आहे. विमान वाहतूक जगातील एक रद्दड वाहतूक आहे आणि पत्रे वेळेवर व पत्त्यांवर पोहचत नाहीत. तुम्ही म्हणता, देशाचा सत्यानाश केला आहे. तुम्ही हे सारखे बोलत असता. पण हे होवू नये, म्हणून तुम्ही स्वत: काय करता?

भूतपूर्व आयुक्त तिनईकर एकदा म्हणाले होते, श्रीमंत माणसांची कुत्री रस्त्यावर चालताना घाण रस्त्यावर टाकतात, हेच लोक पुढे मनपाचे रस्ते फुटपाथ स्वच्छ नसल्याची तक्रार करतात. अमेरिकेत कुत्र्याने रस्त्यावर केलेली घाण कुत्र्याच्या मालकाला काढावी लागते. जपानमध्ये असेच आहे. भारतीय नागरिक तसे इथे करतील?

आपला हातभार शुन्य असताना शासनाने सर्व काही केले पाहिजे, असे आपण गृहित धरुन चालतो. शासनाने सर्वत्र स्वच्छता करावी, असे गृहित धरतो. परंतु, स्वत: सर्वत्र उकिरडा करावयाचे आपण सोडत नाही. आपण कधी मध्येच थांबून रस्त्यावरील कागदाचा कपटा उचलून कचऱ्याच्या पेटीत टाकणार आहोत का? आपली अपेक्षा असते, की रेल्वेने स्वच्छ प्रसाधने पुरवावीत. परंतु प्रसाधने स्वच्छ कशी ठेवावीत, हे आपण कधी शिकणार?

शेवटी मी एवढेच म्हणेन की, देशासाठी आपण काय करणार आहोत, हे स्वत:ला विचारा आणि चांगला भारत घडवण्यासाठी जे करायला हवे ते करा

**.....डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम**

## माहे नोव्हेंबर२०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३०/११/१३ रोजी कै. वडके हॉल येथे नोव्हेंबर, १३ मधील सेवानिवृत्त २६ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता.



यामध्ये १७ वयपरत्वे व ९ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री अनिल गोरे अध्यक्ष, समर्थ मराठी संस्था व सदस्य, मराठी भाषा संवर्धन समिती हे उपस्थित होते. तसेच, मा.डॉ. अंजली साबणे, उप आरोग्य प्रमुख, श्री. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन, श्री. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीस श्री. केंजळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये सेवापूर्ती समारंभ आयोजनाचे महत्व विषद करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तदनंतर मा. अंजली साबणे, मा. बापू पवार यांनी सेवकांना मार्गदर्शन केले. तदनंतर सेवानिवृत्त होणारे डॉ. दिपक जोशी यांनी सेवानिवृत्त सहकाऱ्यांनी आपले आरोग्य जपले पाहिजे. यासाठी रोज ३० मिनिटे चालणे व भुक लागल्यावरच जेवणे असा सल्ला दिला. त्यामुळे आपले आरोग्य चांगले राहते, असे नमूद करुन पुणे महापालिकेचे आभार मानले. त्याचबरोबर श्रीमती दोंदे अचला व श्री. खामकर रमेश यांनीही आपले मनोगत व्यक्त करुन महापालिकेचे ऋणी असल्याबाबत भावना व्यक्त केल्या.

प्रमुख पाहुणे मा. श्री. अनिल गोरे यांनी पुणे महानगरपालिकेचे सेवक हे चांगले काम करीत असून, नागरिकांच्या अपेक्षा वाढत असल्याबाबत नमूद केले. मनुष्य स्वभाव हा हावरा असल्याने कितीही सेवा दिल्या तरी आणखी हवे अशी त्यांची अपेक्षा असते. डॉ. जोशी यांनी दिलेल्या सूचना सर्वांनी पाळल्यास महापालिकेच्या आरोग्याचा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होईल, असेही त्यांनी नमूद केले.महापालिका काम करते म्हणजे महापालिकेतील सर्व कर्मचारी काम करत असतात. मी एक पुणेकर म्हणून तुम्हा सर्व कर्मचाऱ्यांचा आभारी आहे, असे नमूद करुन त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर सेवानिवृत्तांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन सौ.अलका जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजनामध्ये श्री. घोलप, श्री.राजपुरे, श्री.गेजगे, श्री. कांबळे व श्री. कारभळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

**कल्याणवार्ता**
नोव्हेंबर, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या
मतांशी प्रकाशक, संपादक,
कार्यकारी संपादक व पुणे
महापालिका
सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/
१२५३/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org

## हसून हसून

पोहण्याच्या प्रशिक्षकांनी मुलांना एक प्रश्न विचारला –

पोहताना तुमचं लक्ष कुठे असलं पाहिजे ?

प्रशिक्षणार्थी म्हणाला – काठावर काढून ठेवलेल्या कपड्यांकडे !

## सफाई कामगाराचा प्रामाणिकपणा

पुणे महानगरपालिकेच्या धनकवडी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कात्रज येथील सफाई कामगार श्री. राहुल सुतकर म्हणजे प्रामाणिकपणाचे एक उदाहरण आहे. आजकाल सोन्याचे दागिने पळविण्याऱ्यांची संख्या वाढत असतानाच अंदाजे सव्वालाख रुपयांचे सोन्याचे दागिने परत देवून श्री. राहुल सुतकर यांनी एक वेगळा आदर्श घालून दिला आहे.

कात्रज येथील शिवशंभोनगर परिसरातील श्रीमती चंद्रभागा खाटपे भात काढणीसाठी गावी गेल्या होत्या. त्यांची सून मेघा खाटपे या दिवाळीनिमित्त घराची साफसफाई करत असताना स्वयंपाक घरात कागदात बांधून ठेवलेले मोहनमाळ व लक्ष्मीहार हे सोन्याचे दागिनेही कचऱ्याबरोबर कचराकुंडीत टाकले गेले.

साठवलेला कचरा ट्रॉलीत भरताना श्री. सुतकर यांना कागदाच्या पुरचुंडीमध्ये एक मोहनमाळ व लक्ष्मीहार असे चार तोळे सोन्याचे दागिने सापडले. ही माहिती त्यांनी जवळच्या एका दुकानमालकाला दिली व कोणी दागिने शोधण्यासाठी आल्यास त्यांना कात्रज हजेरीकोठीवर पाठविण्यास सांगितले.



लक्ष्मीपूजनापूर्वी दागिने गहाळ झाल्याचे खाटपे यांच्या लक्षात आले. घरात शोधाशोध करुनही दागिने सापडले नाहीत. घरात चोरी झाली असेल किंवा दागिने कचऱ्यातून गहाळ झाले असतील असे त्यांना वाटले. कचऱ्यातून गहाळ झाल्यास परत मिळण्याची त्यांना आशाच नव्हती. तरीही कचरा टाकलेल्या परिसराचा शोध घेण्याचे त्यांनी ठरविले. त्या ठिकाणी शोधाशोध केली. जवळच्या दुकानमालकाकडे चौकशी केली असता त्याने कात्रज हजेरी कोठी जाण्याबाबत सांगितले. हजेरीकोठीचे मोकादम श्री. सोमनाथ बिबवे यांनी शहानिशा केल्या असता सदर दागिने श्री. खाटपे यांचे असल्याचे सिध्द झाल्याने त्यांना ते परत करण्यात आले. श्री. सुतकर यांच्यामुळे आम्हाला सोने परत मिळाले, असे सांगून खाटपे कुटुंबियांनी त्यांचे आभार मानले. ज्यांचे सोने आहे त्यांना परत दिल्याचा मला आनंद आहे, अशी भावना श्री. सुतकर यांनी व्यक्त केली. मा. वसंत मोरे, सभासद, पुणे मनपा, मानवता प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. विकास फाटे, सोमनाथ बिबवे व कोठी कर्मचाऱ्यांनी श्री. सुतकर यांचे अभिनंदन केले.

## दिपावली

दिवाळीसंदर्भात असलेल्या गमतीदार माहितीने पुराणात तसेच इतिहासात आपले स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच हा सण एखाद्या विशिष्ट समूहाचा न राहता संपूर्ण राष्ट्राचा बनला आहे.दिवाळीविषयी काही रंगतदार व गमतीदार माहिती :

१. प्रभू राम रावणाचा पराभव केल्यानंतर आयोध्येला परतत असताना त्यांच्या वाटेवर लोकांनी दिवे लावून स्वागत केल्याचे त्रेतायुगात सांगितले आहे.

२. देवीने महाकालीचे रुप धारण करुन राक्षसांचा वध केला होता. त्याचा वध केल्यानंतरही महाकालीचा क्रोध कमी झाला नव्हता. तेंव्हा भगवान शंकराने स्वत: देवीच्या चरणी लोटांगण घातले. शंकराच्या शरीर स्पर्शाने महाकालीचा क्रोध शांत झाला. त्याची आठवण म्हणून लक्ष्मीची पूजा केली जाते. या दिवशी तिच्या रौद्ररुपाची पूजा करण्याची प्रथा आहे.

३. बळीराजाने आपल्या पराक्रमाच्या जोरावर त्रैलोक्यावर विजय मिळविला होता. या विजयाने भयभीत झालेल्या देवांनी भगवान विष्णूची प्रार्थना केली. त्यांची प्रार्थना ऐकून विष्णूने वामन रुप धारण करुन बळी राजाला तीन पायांत दान मागितले. विष्णूने तीन पायाने त्रैलोक्य घेतले. बळीच्या दानशूरपणामुळे प्रसन्न झालेल्या विष्णूने त्याला पाताळाचे राज्य देवून भू लोकवासी त्याच्या आठवणीनिमित्त प्रत्येक वर्षी दिवाळी साजरी करतील असे आश्वासन दिले.

४. शिखांचे सहावे गुरु हरगोविंदसिंग बादशाह जहांगीरच्या कैदेतून सुटून कार्तिक अमावस्येच्या दिवशी अमृतसरला आले होते.

५. दिवाळीच्या एक दिवस अगोदर म्हणजे चतुर्दशीला श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला होता. यामुळे आनंदी झालेल्या गोकुळवासियांनी दुसऱ्या दिवशी अमावस्येला दिवे लावून आनंद साजरा केला होता.

६. इसवी सन पूर्व ५०० वर्षांपूर्वी मोहेंजोदडो येथे सापडलेल्या अवशेषांमध्ये एका मातीच्या मूर्तीनुसार त्याकाळी दिवाळी साजरी केली जात असल्याचे समजते. मूर्तीच्या दोन्ही बाजूला दिवे जळताना दिसून येत होते.

७. इसवी सन पूर्व २५०० वर्षांपूर्वी गौतम बुध्दांच्या अनुयायांनी त्यांच्या स्वागतासाठी लाखो दिवे लावून दिवाळी साजरी केली होती.

८. सम्राट विक्रमादित्याचा राज्याभिषेक दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्याच दिवशी दिवे लावून जनतेने आनंद साजरा केला होता.

९. इसवी सन पूर्व चौथ्या शतकातील कौटिल्य अर्थशास्त्रानुसार कार्तिक अमावस्येच्या दिवशी मंदिरात आणि घाटावर (नदी किनारी) मोठ्या प्रमाणात दिवे लावले जात असल्याचे सांगितले आहे.

१०. अमृतसर येथील सुवर्णमंदिराचे बांधकाम दिवाळीच्या दिवशी सुरु झाले होते.

११. जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांनी दिवाळीच्या दिवशीच बिहारमधील पावपुरी येथे आपल्या शरीराचा त्याग केला होता. महावीर सवंत् त्यांच्या दुसऱ्या दिवशी सुरु होते. त्यामुळे अनेक प्रांतातील लोक याला नवीन वर्षाची सुरुवात मानतात. प्राचीन जैन ग्रंथात दीपोत्सवाचे वर्णन आहे. महावीर निर्वाणामुळे जी अंतर्ज्योती कायमची विझून गेली होती, तिची कमतरता पूर्ण करण्यासाठी आपण बहिर्ज्योतीचे प्रतीक म्हणून दिवे लावू या असे कल्पसूत्रात सांगितले आहे.

१२. पंजाबमध्ये जन्मलेल्या स्वामी रामतीर्थ आणि महाप्रयाण या दोघांचा जन्म दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्यांनी दिवाळीच्या दिवशी गंगाकिनारी स्नान करताना ओम म्हणून समाधी घेतली होती.

१३. महर्षी दयानंदांनी दिवाळीच्या दिवशी अजमेरजवळ समाधी घेतली होती. त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली होती.

१४. मोगल सम्राट अकबराच्या काळात दौलतखान्यासमोर ४० गज उंच बांबूवर एक मोठा आकाशकंदील लटकविला जात असे. यावेळी बादशहा देखील दिवाळी मोठ्या आनंदाने साजरी करत असे.

१५. मोगल वंशाचे शेवटचे सम्राट बहादुरशहा जफर दिवाळी सणाच्या रुपात साजरी करत असत आणि यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होत असत.

१६. शहा आलम दुसरा यांच्या काळात संपूर्ण शाही महाल दिव्यांनी सजविला जात असे आणि लाल किल्ल्यावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात हिंदू-मुसलमान सहभागी होत असत.

उपरोक्त इतिहासाच्या अनुषंगाने आजही दिपावली सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने संपूर्ण देशभर साजरा केला जातो. त्यामध्ये लहान मुलांपासून वयोवृध्दांपर्यंत सर्वजण आनंदाने सहभागी होतात.